# महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
# दिंडोरी रोड, नाशिक ४२२ ००४.

*****************************************************************************************

## परिपत्रक

**विषय:- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) पदाकरीता सन २००७ मध्ये घेतली जाणारी व्यावसायीक परीक्षा.**

जलसंपदा (पाटबंधारे) विभाग व सार्वजनीक बांधकाम विभागातील स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत शाखेतील कनिष्ठ अभियंता यांचे करीता, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक हे (जलसंपदा) पाटबंधारे विभागाच्या दिनांक १८/१/८३ च्या शासन निर्णय क्रमंक इएक्सएम १०८२/४४५-ई(१३) मधील तरतुदीनुसार व प्रचलित अभ्यासक्रमानुसार दिनांक २६/१२/२००७ ते २९/१२/२००७ या कालावधीत सन २००७ मधील व्यावसायीक परीक्षा घेणार आहेत.**(सदरचे परिपत्रक, प्रवेश अर्जासंबंधीच्या सूचना व प्रवेश अर्ज नमुना इ.माहिती प्रबोधिनीच्या www.wresc.org या website वर उपलब्ध आहे.)**

२. ही परीक्षा जलसंपदा विभाग (पाटबंधारे विभाग) व सार्वजनिक बांधकाम विभागातील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता यांचेकरीता प्रचलित शासकीय नियमानुसार व्यावसायिक परीक्षा आहे. त्याच बरोबर शासनाचे इतर विभाग वनखाते / जिल्हा परिषद / महानगरपालीका व इतर महामंडळातील कनिष्ठ अभियंता पदावरील अभियंत्यांनाही या व्यावसायीक परीक्षेला बसता येईल. तसेंच स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (उप अवेक्षक / सर्वेक्षक) व तांत्रिक सहाय्यक यांचेकरीता ती कनिष्ठ अभियंता या संवर्गात येण्यासाठीची पात्रता परीक्षा म्हणून धरली जाईल. मात्र त्यांना प्रचलित शासकीय नियमानुसार व आदेशानुसार प्रवेश दिला जाईल. प्रचलित नियमात जर काही बदल झाल्यास सुधारित नियमाप्रमाणे प्रवेश दिला जाईल.

३. परीक्षेचा कालावधी साधारणपणे परीच्छेद १ मध्ये दर्शविल्याप्रमाणेच असेल. मात्र सार्वजनिक सुट्टी व इतर अनपेक्षीत बार्बीमुळे बदल झाल्यास त्यांत फेरफार होण्याची शक्यता राहील.

४. इच्छुक उमेदवारांनी प्रवेशासाठी अर्जाचा छापील / झेरॉक्स नमुना परस्पर संबंधित नियंत्रक अधिका-यांकडून (अधीक्षक अभियंता / प्रशासक / मुख्य कार्यकारी अधिकारी / महानगरपालिका आयुक्त / महसुल आयुक्त) मागवून घ्यावा किंवा प्रबोधिनीच्या www.wresc.org या संकेतस्थळावरुन Down load करुन घ्यावा. तो पूर्णपणे भरुन दिनांक २०/१०/२००७ पूर्वी या प्रबोधिनीमध्ये पोहोंचेल अशारितीने संबंधित मंडळ कार्यालयामार्फतच / नियंत्रक अधिका-यामार्फतच सादर करणे आवश्यक आहे. दिनांक २०/१०/२००७ नंतर आलेले तसेंच अपूर्ण अथवा चुकीची माहिती असलेले किंवा **संबंधित नियंत्रक प्राधिकारी (अधीक्षक अभियंता / प्रशासक / मुख्य कार्यकारी अधिकारी / महानगरपालिका आयुक्त / महसुल आयुक्त) यांचे मार्फत न आलेले अर्ज नामंजूर करुन दप्तरी दाखल केले जातील याची नोंद घ्यावी.** नियंत्रक अधिका-यांनी अर्ज पाठवितांना अर्जदाराने घेतलेला ऐच्छिक विषय त्यांचा कामाशी संबंधित आहे याची खात्री करुनच शिफारस करावी. ऐच्छिक विषय अर्जदाराच्या कामाशी संबंधित नसल्यास अर्ज रद्द करण्यांत येईल. **जर एखाद्या कार्यालयाकडून अर्ज पाठविण्यास उशीर झाला व परीक्षार्थींना प्रवेश नाकारण्यांत आला तर त्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही.**

५. नियंत्रक अधिकारी (अधीक्षक अभियंता / प्रशासक / मुख्य कार्यकारी अधिकारी / महानगरपालिका आयुक्त / महसुल आयुक्त) यांना विनंती करण्यांत येते की, या प्रबोधिनीच्या संकेत स्थळावरुन (website) नमुना अर्ज, सूचना व प्रवेश पत्र इत्यादिच्या झेरॉक्स करुन त्याच्या प्रती संबंधित परीक्षार्थींना त्यांचे मागणीनुसार परस्पर द्याव्यात. परीक्षार्थींनी संपूर्ण भरुन, दिलेला प्रवेश अर्ज व्यवस्थीत तपासून त्यांत त्रुटी नाहीत याची खात्री करुन **सूचना पत्रकाप्रमाणे सर्व दृष्टीने पूर्ण असलेले प्रवेश अर्ज प्रबोधिनीकडे दिनांक २०/१०/२००७ पर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील असे पाठवावेत. जर नियंत्रक अधिकारी अधीक्षक अभियंता यांच्या खालच्या दर्जाचा असेल परंतु प्राधिकृत करण्यात आला असेत तर ते नियंत्रक अधिकारी म्हणून शिफारस करु शकतील. परंतू त्यांनी प्राधिकृत अधिकारी आहेत अशा आदेशाची प्रत सोबत पाठवावी. त्रुटी असलेले प्रवेश अर्ज या प्रबोधिनीत दप्तरी दाखल करण्यात येतील व ते त्रुटींची पूर्तता करण्याकरिता परत पाठविण्यात येणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती. प्रवेश अर्जासोबत शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडाव्यात. अन्यथा प्रवेश नाकारला जाईल याची नोंद घ्यावी.**

जा.क्र.मअप्रप्रा/कअ/व्याप/प्रवेश अर्ज/२१२४/सन २००७
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
दिंडोरी रोड, नाशिक ४२२ ००४.
दिनांक: १८/०८/२००७.

**मुख्य अभियंता व संचालक**
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
नाशिक.

**कृपया मागे पहावे.**

**प्रत** - मा. प्रधान सचिव (जलसंपदा विभाग), मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
**सहपत्र:** वरीलप्रमाणे.

**प्रत** - मा.सचिव (ला.क्षे.वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सवियन सादर.
**सहपत्र:** वरील प्रमाणे.

**प्रत** - मा.सचिव,(सा.बां./रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सवियन सादर.
**सहपत्र :** वरील प्रमाणे.

**प्रत-** मा. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, संशोधन महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, दिंडोरी रोड, नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.
**सहपत्र :** वरील प्रमाणे.

**प्रत** - मा. महसूल आयुक्त ------------------------------------ विभाग, यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
**सहपत्र:** वरील प्रमाणे.

**प्रत -** मुख्य अभियंता, -------------------------------------------------------, जलसंपदा विभाग/ सार्वजनिक बांधकाम विभाग, यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
**सहपत्र :** वरील प्रमाणे.

**प्रत** - अधीक्षक अभियंता / अधीक्षक अभियंता व प्रशासक, ------------------------- जलसंपदा विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग, यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
**सहपत्र :** वरील प्रमाणे.

**प्रत -** प्रशासक / आयुक्त, ------------------- पालिका / महानगरपालीका, ---------------------------- यांचे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
**सहपत्र :** वरील प्रमाणे.

**प्रत** - नियंत्रक अधिकारी / अधीक्षक अभियंता / अ.अ.व प्रशासक/ मु.का.अ.(जि.प./न.पा.) यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
**सहपत्र :** वरील प्रमाणे.

**प्रत -** अधीक्षक अभियंता व उपप्राचार्य, अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक यांना माहितीस्तव सादर.

**प्रत -** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद -------------------------------- यांचे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
**सहपत्र :** वरील प्रमाणे.

**प्रत** - उपायुक्त, दुग्धशाळा व विकास, ----------------------------------------------------------- यांचे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
**सहपत्र :** वरील प्रमाणे.

**प्रत -** वन अभियंता, महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांचे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
**सहपत्र :** वरील प्रमाणे.

**प्रत** - कनिष्ठ अभियंता धारिका सन २००७.

**प्रत** - सूचना फलक.

**************

# महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक
## कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) यांची व्यावसायिक परीक्षा
## सन २००७
## व्या व सा यि क प री क्षे चे वे ळा प त्र क

| वार<br>दिनांक | कालावधी | विषय | लेखी / तोंडी |
|---|---|---|---|
| बुधवार<br>२६/१२/२००७ | १०.००<br>ते<br>१३.०० | सामान्य अभियांत्रिकी (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) | लेखी |
| | १५.००<br>ते<br>१५.३० | सामान्य अभियांत्रिकी (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) | तोंडी |
| गुरुवार<br>२७/१२/२००७ | १०.००<br>ते<br>१३.०० | ऐच्छिक विषय (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) | लेखी |
| | १५.००<br>ते<br>१५.३० | ऐच्छिक विषय (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) | तोंडी |
| शुक्रवार<br>२८/१२/२००७ | ०९.००<br>ते<br>१३.०० | चित्ररेखन (स्थापत्य / विद्युत) | लेखी |
| | १४.३०<br>ते<br>१७.३० | लेखा नियम (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) | लेखी |
| शनिवार<br>२९/१२/२००७ | समन्वय अधिकारी कालावधी जाहीर करतील. | प्रात्यक्षिक (स्थापत्य / यांत्रिकी) | लेखी<br>तोंडी |

**विशेष सूचनाः-** प्रात्यक्षिक परीक्षेचा कार्यक्रम दिनांक २८/१२/२००७ रोजी त्या त्या केंद्रावर समन्वय अधिकारी जाहिर करतील.

**मुख्य अभियंता व संचालक**
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
नाशिक.

# सूचनापत्रक
# महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक.
# कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / यांत्रिकी विद्युत) यांची व्यावसायीक परीक्षा सन २००७.
# प्रवेश अर्ज भरण्यासाठी सूचना

१) प्रवेश अर्ज भरण्यास सुरवात करण्यापूर्वी खालील सूचना काळजीपूर्वक वाचा.

२) या वर्षाच्याच विहीत नमुन्यात अर्ज करावा. प्रवेश अर्जाची टंकलिखीत अथवा झेरॉक्स कॉपी असावी. अपूर्ण भरलेला, असत्य माहिती दिलेला अर्ज नामंजूर करण्यांत येईल. योग्य नियंत्रक प्राधिकारी यांचे मार्फतच अर्ज पाठवावा. योग्य नियंत्रक अधिकारी यांच्यामार्फत जे अर्ज येणार नाहीत ते नामंजूर होतील. **अपूर्ण अर्ज पूर्ततेसाठी परत पाठविला जाणार नाही व अर्ज दप्तरी दाखल करण्यांत येतील. याबाबत कोणताही पत्रव्यवहार करण्यांत येणार नाही. तेंव्हा सबंधीत कार्यकारी अभियंता आणि अधीक्षक अभियंता / नियंत्रक अधिकारी यांनी अर्ज तपशिलवार तपासून उणीवा राहणार नाहीत याची पूर्ण खात्री करुनच पुढे पाठवावेत. सर्वसाधारण राहणा-या उणिवांची यादी सोबत जोडली आहे. अपूर्ण अर्ज विनापत्रव्यवहार अशाप्रकारे दप्तर दाखल झाले तर त्याची जबाबदारी सबंधित अर्जदाराची व त्याचे नियंत्रक अधिका-यांची राहील.**

३) संपूर्ण अर्जाचा फॉर्म खालीलप्रमणे चार विभागात विभागलेला आहे.
विभाग १- अर्ज
विभाग २- परीक्षार्थीची माहिती
विभाग ३- पृष्ठांकन व प्रमाणपत्रे
विभाग ४- अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालयाचे उपयोगासाठी.

४) विहित नमुन्यातील मूळ अर्ज एकाच प्रतीत पाठवावयाचा आहे. त्यासोबत हे सूचनापत्रक पाठवावयाचे नाही. सूचना पत्रकानुसार अर्जाचे सर्व विभाग / रकाने भरले आहेत किंवा नाहीत ते पाठविण्यापूर्वी तपासून पहावेत. त्यासाठी चेकलिस्ट सोबत दिली आहे. विभाग १ व २ हे स्वत: परीक्षार्थीने भरावयाचे आहेत. विभाग ३ परीक्षार्थीच्या अधिका-यांनी प्रमाणपत्रे व पृष्ठांकनासाठी वापरावयाचा आहे. विभाग क्रमांक ४ हा महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनीच्या उपयोगासाठी आहे.

५) सर्वसाधारणपणे व्यावसायीक परीक्षा ही वर्षातून एकदा शाळांच्या सुट्टया बघून घेतली जाते. म्हणून अर्ज स्विकारण्यासाठी अखेरचा दिनांक परिपत्रकात दिलेला आहे तो लक्षात ठेवावा. अर्जदाराने आपला अर्ज सर्व त-हेने पूर्ण करुन या मुदतीचे आंत प्रबोधिनीत पोहोंचतील अशी काळजी घ्यावी. उशिरा पोहेंचणारे अर्ज कोणत्याही कारणास्तव स्विकारले जाणार नाहीत.

६) उमेदवाराची परीक्षेस बसण्यास पात्रता ठरविण्यासाठी त्याने खालीलप्रमणे सेवाकाळ पूर्ण केला असण्याची आवश्यकता आहे.

| | |
|---|---|
| अ) सहाय्यक अभियंता (श्रेणी २), शाखा अभियंता (कनिष्ठ अभियंता संवर्गातील सेवासहीत) | - १ वर्ष पूर्ण विनाखंड |
| ब) कनिष्ठ अभियंता | - १ वर्ष पूर्ण विनाखंड |
| क) उपअवेक्षक / सर्वेक्षक (जे आरेखक/सर्वेक्षक हा कोर्स औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण झाले असतील त्यांना) / स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक. | - याच संवर्गात ४ वर्षे पूर्ण, विनाखंड |

ड) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून आरेखक / सर्वेक्षक / स्था.अ.स. हा कोर्स उत्तीर्ण झालेले व तांत्रिक सहाय्यक या पदी प्रथम नियुक्त या दोन्ही पदावरील सेवा एकत्रित होऊन नंतर उपअवेक्षक किंवा स्था.अ.स. झालेले. - ४ वर्षे पूर्ण (तांत्रिक सहा.व उपअवेक्षक/ सर्वेक्षक/स्था.अ.स धरुन.)

इ) तांत्रिक सहाय्यक पदोन्नती होऊन उपअवेक्षक/सर्वेक्षक/स्थाअस झाले असल्यास (वरील ४ था वर्ग वगळून) - ५ वर्षे पूर्ण. (तांत्रिक सहाय्यक/उप अवेक्षक/ सर्वेक्षक/स्था.अ.स. या दोन्ही पदावरील सेवा एकत्रित धरुन.)

फ) तांत्रिक सहाय्यक - १० वर्षे पूर्ण. (तांत्रिक सहाय्यक या पदावर परंतू उपअवेक्षक या पदाची पात्रता परीक्षा पास / स्थाअस परीक्षा पास व तो असलेल्या मंडळात पदोन्नतीने भरावयाच्या जागेच्या तीन पटीच्या मर्यादेत.)

**टीपः-** १) प्रचलित नियमामध्ये काही बदल झाल्यास सुधारीत नियमाप्रमाणे परीक्षार्थींना प्रवेश दिला जाईल.
२) सेवाकाल ठरविण्याकरीता परीक्षेच्या पहील्या दिवसापर्यंत सेवाकाल पूर्ण आहे या प्रमाणे आकडेमोड करावी.

७) अभियांत्रिकी क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता असूनही (उदा. अभियांत्रिकी पदविका इ.) जे उमेदवार सूचना क्रमांक १४ मध्ये दर्शविलेल्या पदांव्यातिरिक्त इतर पदांवरील व्यक्तींनी (उदा. आरेखक, मिस्त्री, अमीन, मुकादम) या परीक्षेसाठी अर्ज करु नये.

७-अ) **परीक्षार्थी ज्या पदावर स्थानापन्न आहे त्या पदावरील नेमणूकीच्या आदेशाची साक्षांकीत सत्यप्रत जोडणे अपरीहार्य राहील याची नोंद घ्यावी. त्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.**

८) शेतकी क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता असणा-या अभियंत्यांनी (सहा. अभियता/कनिष्ठ अभियंता इ.) अर्ज करू नये. या परीक्षेस बसण्याची त्यांना परवानगी दिली जाणार नाही.

९) अर्ज भरतांना विभाग क्र. २ मधील बाब क्रमांक १ (अ) भरतांना अर्जदाराने खालील कोष्टकानुसार संकेतांक हा चौकोन क्रमांक १ मध्ये व व्यावसायीक परीक्षेचे नाव चौकोन क्रमांक २ मध्ये लिहावे.

| संकेतांक | व्यावसायीक परीक्षा |
|---|---|
| ०१ | सहाय्यक अभियंता श्रेणी २, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) |
| ०२ | सहाय्यक अभियंता श्रेणी २, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) |
| ०३ | सहाय्यक अभियंता श्रेणी २, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता (विद्युत आणि वि. यांत्रिकी) |
| ०४ | उपअवेक्षक / सर्वेक्षक / स्थाअस/ (कनिष्ठ अभियंता संवर्ग पात्रतेसाठी परीक्षा) |
| ०५ | तांत्रिक सहाय्यक (कनिष्ठ अभियंता संवर्ग पात्रतेसाठी परीक्षा) |

१०) परीक्षार्थींना तो काम करीत असलेल्या आपल्या मुख्यालयाचा जिल्हा व संकेतांक २ (अ) मध्ये द्यावा.

| संकेतांक | जिल्हा | संकेतांक | जिल्हा |
|---|---|---|---|
| ०१ | सिंधुदुर्ग | १८ | परभणी |
| .०२ | रत्नागिरी | १९ | जालना |
| ०३ | रायगड | २० | औरंगाबाद |
| ०४ | ठाणे | २१ | बीड |
| ०५ | नाशिक | २२ | उस्मानाबाद |
| ०६ | धुळे | २३ | लातूर |
| ०७ | जळगांव | २४ | सोलापूर |
| ०८ | बुलढाणा | २५ | कोल्हापूर |
| ०९ | अकोला | २६ | सांगली |
| १० | यवतमाळ | २७ | सातारा |
| ११ | अमरावती | २८ | पुणे |
| १२ | वर्धा | २९ | अहमदनगर |
| १३ | नागपूर | ३० | मुंबई शहर |
| १४ | भंडारा | ३० (अ) | मुंबई उपनगर |
| १५ | चंद्रपूर | ३१ | गोंदिया |
| १६ | गडचिरोली | ३२ | नंदुरबार |
| १७ | नांदेड | ३३ | वाशिम |
| | | ३४ | हिंगोली. |

सदर परीक्षेची केंद्रे आणि त्या त्या केंद्रासाठी ठरविलेले जिल्हे व संकेतांक खालीलप्रमाणे आहेत. त्याप्रमाणे २ (ब) मध्ये भरावे. जर एखाद्या केंद्रामधील परीक्षार्थींची संख्या कमी असेल तर महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनीच्या सोयीनुसार सदरचे केंद्रातील परीक्षार्थी नजिकच्या केंद्रास जोडले जातील.

| अभियांत्रिकी विभाग | केंद्र क्रमांक (संकेतांक) | केंद्राचे ठिकाण | केंद्रांतर्गत जिल्हे |
|---|---|---|---|
| स्थापत्य | ३०१ | ठाणे | ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड |
| स्थापत्य | ३०२ | जळगांव | धुळे, जळगांव, नंदुरबार |
| स्थापत्य | ३०३ | अकोला | बुलढाणा, अकोला, यवतमाळ, वाशिम |
| स्थापत्य | ३०४ | अमरावती | अमरावती, वर्धा, नागपूर |
| स्थापत्य | ३०५ | चंद्रपूर | भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया |
| स्थापत्य | ३०६ | नांदेड | नांदेड, परभणी, हिंगोली |
| स्थापत्य | ३०७ | सोलापूर | उस्मानाबाद, लातूर, सोलापूर |
| स्थापत्य | ३०९ | रत्नागिरी | सिंधुदुर्ग, रत्नागिरी |
| स्थापत्य | ३१० | सातारा | पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली |
| स्थापत्य | ३११ | अहमदनगर | अहमदनगर, नाशिक |
| स्थापत्य | ३१२ | बीड | औरंगाबाद, बीड, जालना |
| यांत्रिकी | ३१३ | नाशिक | महाराष्ट्रातील सर्व जिल्हे |
| विद्युत | ३१४ | नाशिक | महाराष्ट्रातील सर्व जिल्हे |

११) अर्जदाराने विभाग क्रमांक २ मधील बाब क्रमांक ३ (अ) मधील चौक १ व २ मध्ये खालील तक्त्यानुसार तो काम करीत असलेल्या विभाग / सघटनेबद्दल अनुक्रमे संकेतांक व नांव लिहावे.

| संकेतांक | विभाग / संघटना / मंडळ |
|---|---|
| ०१ | जलसंपदा विभाग (पाटबंधारे विभाग) |
| ०२ | सार्वजनीक बांधकाम विभाग |
| ०३ | जिल्हा परिषद (पा.वि.) |
| ०४ | जिल्हा परिषद (सा.बां ) |
| ०५ | शेतकी आणि सहकर विभागाकरीता, सहकारी सोसायटया, दुग्ध योजना - दुग्ध शाळा विकास, वन विभाग इत्यादि. |
| ०६ | महाराष्ट्र सिंचन महामंडळ, भूमी व जल व्यवस्थापन संस्था, महाराष्ट्र भूमी विकास मंडळ इ. संघटना, तंत्रशिक्षण सचालनालय व महाराष्ट्र शासनाचे उपक्रम. |
| ०७ | वरील खेरीज इतर. |

१२) विभाग क्रमांक २ मधील बाब क्रमांक ३ (ब) मध्ये नियंत्रक अधिकारी व क्रमांक ३ (क) मध्ये विभागीय स्तरावरील कार्यालयाचे नांव, पोस्टाचा पत्ता व टपाल सूची क्रमांक व कार्यालय दूरध्वनी क्रमांक कोडसह लिहावे.

१३) विभाग क्रमांक २ मधील बाब क्रमांक ४ (अ) मध्ये अर्जदाराने संपूर्ण नांव आडनांव सुरु होणारे मराठी व इंग्रजी ठळक अक्षरात लिहावे.

१४) विभाग क्रमांक २ मधील बाब क्रमांक ४ (ब) मध्ये संकेतांक व पदनाम खालील तक्त्यानुसार भरावे.

| अभियांत्रिकी विभाग | संकेतांक | पदनाम |
|---|---|---|
| स्थापत्य | ११ | सहाय्यक अभियंता श्रेणी २ |
| स्थापत्य | १२ | शाखा अभियंता |
| स्थापत्य | १३ | कनिष्ठ अभियंता |
| स्थापत्य | १४ | उपअवेक्षक व तत्सम संवर्ग (स्था.अ.स.) |
| स्थापत्य | १५ | सर्वेक्षक |
| स्थापत्य | १६ | तांत्रिक सहाय्यक |
| यांत्रिकी | २१ | सहाय्यक अभियंता श्रेण २ |
| यांत्रिकी | २२ | शाखा अभियंता |
| यांत्रिकी | २३ | कनिष्ठ अभियंता |
| यांत्रिकी | २४ | उपअवेक्षक व तत्सम संवर्ग |
| यांत्रिकी | २५ | सर्वेक्षक |
| विद्युत (सा.बां) | ३१ | सहाय्यक अभियंता श्रेणी २ |
| - कित्ता - | ३२ | शाखा अभियंता |
| - कित्ता - | ३३ | कनिष्ठ अभियंता |
| - कित्ता - | ३४ | उपअवेक्षक व तत्सम संवर्ग |
| - कित्ता - | ३५ | सर्वेक्षक |
| विद्युत (जलविद्युत) | ४१ | सहाय्यक अभियंता श्रेणी २ |
| - कित्ता - | ४२ | शाखा अभियंता |
| - कित्ता - | ४३ | कनिष्ठ अभियंता |
| - कित्ता - | ४४ | उपअवेक्षक व तत्सम संवर्ग |
| - कित्ता - | ४५ | सर्वेक्षक |

१५) **बाब क्रमांक ४ मधील (क) उत्तर देतांना तांत्रिक पदवी अथवा पदविका किंवा असलेली तांत्रिक शैक्षणिक अर्हता**
**लिहवी व प्रमाणपत्रांच्या प्रती जोडाव्यात.**

१६) विभाग क्रमांक २ मधील बाब क्रमांक ४(ड) मध्ये हल्ली धारण केलेल्या कार्यभाराचे स्वरुप जसे - सर्वेक्षण, बांधकाम, कार्यालयीन काम इत्यादि द्यावे.

१७) विभाग क्रमांक २ मधील - ४(इ). ५(अ). ५(ब) मध्ये मागितलेली महिती सेवापुस्तकाशी सुसंगत असावी. ५(ब) मध्ये लागू असलेलेच शब्द ठेवणे, अनावश्यक खोडून टाकणे. प्रवेशासाठी ही माहिती अत्यंत आवश्यक आहे तसेंच या बाबतीत अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. जर परीक्षार्थी दिलेल्या संवर्गापैकी एका पेक्षा अधिक संवर्गात काम केलेला असेल तर त्याप्रमाणे वेगवेगळया संवर्गातील सेवा कालाची माहिती भरणे आवश्यक आहे.

१८) अर्जदार ज्या अभियांत्रिकी कक्षाशी संलग्न आहे त्याचा संकेतांक व नांव ही बाब क्रमांक ६ (अ) च्या चौकट क्रमांक १ व २ मध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे नमूद करावी.

| संकेतांक | अभियांत्रिकी कक्ष |
|---|---|
| ०१ | स्थापत्य |
| ०२ | यांत्रिकी |
| ०३ | विद्युत (सा.बां.विभाग) |
| ०४ | विद्युत / यांत्रिकी (जलविद्युत) |

१९) अर्जदार गेली ३ वर्षे ज्या शाखेत काम करीत आहे त्याचा संकेतांक व नांव बाब क्रमांक ६(ब) च्या चौकट क्रमांक १ व २ मध्ये खाली दर्शविल्याप्रमाण नमूद करावेत.

| संकेतांक | शाखा |
|---|---|
| ०१ | बांधकाम |
| ०२ | व्यवस्थापन व परिरक्षण |
| ०३ | सर्वेक्षण व अन्वेषण |
| ०४ | संकल्पचित्र संघटना |
| ०५ | संशोधन संघटना |
| ०६ | प्रशिक्षण संघटना |
| ०७ | प्रशासकीय अथवा कार्यालय संलग्न |
| ०८ | इतर विभागीय / राज्य सवेच्या बाहेरील सेवेकडे वर्ग केलेला |

अर्जदाराने गेल्या ३ वर्षात जर अनेक निरनिराळया शाखांमध्ये काम केले असेल व त्यांना वेगवेगळया शाखेतील अनुभव असेल तर ते निर्देशित करण्यासाठी अर्जासोबत त्याने आवश्यकता असल्यास स्वतंत्र परिशिष्ट जोडावे.

२०) अर्जदाराने बाब क्रमांक ७ (अ) मधील प्रश्नपत्रिका क्रमांक १ अनिवार्य विषय तो ज्या विभागात काम करीत असेल त्याचेशी संबंधीत असा विषय निवडणे अवश्यक आहे. त्याचा संकेतांक चौकट १ मध्ये नांव व चौकट २ मध्ये खालील प्रमाणे भरणे. निवडलेला विषय परत बदलता येणार नाही. **परीक्षेला प्रथम संधीनंतर बसत असल्यास तुम्हाला मागील परीक्षेतील कोठल्याही विषयांची न बसण्याची सूट मिळत नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

| संकेतांक | पेपर क्रमांक |
|---|---|
| ०१ | सर्वसाधारण स्थापत्य अभियांत्रिकी |
| ०२ | सर्वसाधारण यांत्रिकी अभियांत्रिकी |
| ०३ | सर्वसाधारण विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी |

२१) प्रश्नपत्रिका क्रमांक ३ लेखानियम हा सर्वांना अनिवार्य आहे व त्याचा संकेतांक १९ आहे. तेथे परीक्षार्थींनी काही भरावयाचे नाही.

२२) प्रश्नपत्रिका ४ (अ) **प्रात्यक्षिक अभियांत्रिकी चित्ररेखन**
प्रश्नपत्रिका ४ (ब) **प्रात्यक्षिक व तोंडी** स्थापत्य अभियांत्रिकी अभियंत्यांना अनिवार्य आहे. मात्र यांत्रिकी अभियंत्याना चित्ररेखन व विद्युत अभियंत्यांना प्रात्यक्षिक तोंडी नाही. खाली दिलेला संकेतांक व विषय आपल्याला असलेल्या संबंधित क्रमांक ३ व ४ समोरील चौकट २ मध्ये भरावे.

| संकेतांक | प्रात्यक्षिक विषय |
|---|---|
| प्रश्नपत्रिका ४ (अ) | २० स्थापत्य अभियांत्रिकी चित्ररेखन |
| | २१ विद्युत अभियांत्रिकी चित्ररेखन |
| प्रश्नपत्रिका ४ (ब) | २२ सर्वेक्षण (स्थापत्य) |
| | २३ यांत्रिकी |

२३) **ऐच्छिक विषय निवडतांना उमेदवाराने खाली दिलेल्या विषयांपैकी निवडलेला संकेतांक व विषय हा बाब क्रमांक ७ (ब) मध्ये लिहावा** व तो त्याच्या सध्याच्या कामाशी संबंधीत असावा. लाभक्षेत्र प्राधिकरणातील उमेदवारांनी अनुक्रमांक ४ ते ११ मधील ऐच्छिक विषय घेतला तरी चालेल. मात्र एकदा निवडलेला विषय पुन्हा बदलून मिळणार नाही.

| अभियांत्रिकी शाखा | संकेतांक | ऐच्छिक विषय |
|---|---|---|
| जलसंपदा | ०४ | सिंचन व सिंचन कायदे |
| जलसंपदा | ०५ | भूजलनिःसारण |
| जलसंपदा | ०६ | मातीच्या धरणांची संकल्पचित्रे व बांधकाम |
| जलसंपदा | ०७ | दगडी व काँक्रीट धरणाचे बांधकाम |
| जलसंपदा | ०८ | उपसा सिंचन योजनांचे बांधकाम व परिरक्षण |
| परिसर अभियांत्रिकी | ०९ | पाणी पुरवठा व स्वच्छता अभियांत्रिकी |
| सार्वजनीक बांधकाम | १० | रस्ते, इमारती आणि पूल |
| बंदर | ११ | किनारा अभियांत्रिकी |
| यांत्रिकी अभियांत्रिकी | १२ | विंधन |
| यांत्रिकी अभियांत्रिकी | १३ | यांत्रिकी अवजारांचा उपयोग |
| विद्युत अभियांत्रिकी | १४ | विजेचे प्रकल्प व प्रकल्पांच्या व्यवस्थापनासंबंधीचे कायदे |
| विद्युत अभियांत्रिकी | १५ | जलविद्युत निर्मिती |
| विद्युत अभियांत्रिकी | १६ | उपकेंद्रे व विद्युत निर्मिती केंद्रांची अंतरिक जोडणी |
| विद्युत अभियांत्रिकी | १७ | औष्णिक विद्युत निर्मिती |
| विद्युत अभियांत्रिकी | १८ | विजेचे प्रक्षेपण व वितरण |

२४) **उमेदवार पहिल्यांदा परीक्षेला बसत असल्यास विभाग २, बाब क्रमांक ८ (अ) च्या चौकटीमध्ये निरंक असे लिहावे. दुस-यांदा बसत असल्यास तेथे एक असे लिहावे. अशा पध्दतीत तीन चार असे पूर्वी घेतलेल्या संधीनुसार लिहावे. पूर्वी परीक्षेला बसण्यासाठी अर्ज करुन, आसन क्रमांक मिळाल्यानंतर देखील परीक्षेला अनुपस्थित राहिल्यास परीक्षेची संधी घेतली असे समजण्यात येते.**

२५) **यापूर्वी मिळालेल्या संधीत उमेदवार ३ वेळा नापास झाला असल्यास यावेळी परीक्षेला बसण्यासाठी नियंत्रक प्राधिकारी यांचकडून खास मंजूरी घेण्याची आवश्यकता आहे. (महाराष्ट्र पब्लिक वर्कस् मॅन्युअल ॲपेंडीक्स १, सेक्शन ३ मधील नियमावलीचा १२ वा नियम वाचा) हया नियमानुसर विभाग ३ मधील प्रमाणपत्र एक भरावे व आदेशाची प्रत जोडावी. हे प्रमाणपत्र सहाय्यक अभियंता श्रेणी २, शाखा अभियता, कनिष्ठ अभियंता यांचेसाठी आवश्यक आहे.**

२६) अर्ज भरण्याच्या वेळी तुम्ही जलसंपदा विभाग / सार्वजनीक बांधकाम विभागाखेरीज इतर विभागाचे शासकीय कर्मचारी असल्यास अगर कोणत्याही जिल्हा परिषद / संघटना / महामंडळे यांतील कर्मचारी असल्यास तुम्हाला परीक्षा शुल्क म्हणून रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त) भरावे लागतील. परीक्षा शुल्क फक्त धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) स्विकारले जातील. धनाकर्ष **स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखा, नाशिक कोड नंबर ०४३७ मुख्य अभियंता व संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक** यांचे नावाने काढावा. मात्र तो रेखांकित (क्रॉस्ड् )नसावा. तुम्ही जर परीक्षेला गैरहजर राहिला तर हे परीक्षा शुल्क कोठल्याही स्थितीत परत केले जाणार नाही. अगर त्याचा पुढील वेळेस परीक्षेस बसण्यास उपयोग होऊ शकणार नाही. तुम्ही जलसंपदा विभाग किंवा सार्वजनीक बांधकाम विभागातील शासकीय कर्मचारी असल्यास ९ (अ) मध्ये शुल्क देण्याची आवश्यकता नाही असे स्पष्ट नमूद करावे.

२७) **तुम्हाला वरील सर्व माहिती ही बिनचूक व खरी द्यावी लागेल याची नोंद घ्यावी. नंतर जर असे आढळून आले की, तुम्ही दिलेली माहिती ही दिशाभूल करणारी अगर खोटी आहे तर तुम्ही शिस्तभंगाची कारवाई व परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे मिळालेले फायदे गमावणे यादोन्ही बाबतीत पात्र ठराल.**

२८) परीक्षा केंद्रावर वैयक्तिक वा सांघिक गडबड करणे / गोंधळ घालणे व प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष इतरांना परीक्षेस बसण्यास हरकत घेणे, कॉपी करणे इ. कृत्य शिस्तभंगाचे समजले जाईल.

२९) परीक्षार्थीने त्याचा पत्ता व नियंत्रक अधिका-याचा पत्ता तीन वेळा अर्जाच्या शेवटी दिलेल्या रकान्यांतच भरावा.

३०) प्रबोधिनीने जाहीर केलेला निकाल हा अंतीम राहणार आहे. निकालाची फेरतपासणी केली जाणार नाही. तसेंच उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन केले जात नाही याची कृपया नोंद घेण्यांत यावी.

३१) **प्रवेश अर्जावर उजव्या बाजूचे वरचे कोप-यावर प्रत्येक परीक्षार्थीने स्वतःचा पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवणे अनिवार्य आहे. तसेंच सदर फोटो त्याचे कार्यकारी अभियंता / अधीक्षक अभियंता यांचेकडून साक्षांकित करुन घेणे आवश्यक आहे. साक्षांकित करणा-या अधिका-याची सही व शिक्का फोटोवरच असणे आवश्यक आहे.**

३२) **फॉर्म बरोबरच परीक्षार्थींसाठी कोरे प्रवेशपत्र जोडले आहे. त्याही प्रवेशपत्रावर दर्शविलेल्या जागी परीक्षार्थीने प्रवेश अर्जावर लावलेल्या पासपोर्ट आकराच्या फोटोची दुसरी प्रत चिकटवावयाची आहे व त्याचे कार्यकारी अभियंता / अधीक्षक अभियंता यांचेकडून साक्षांकित करुन घेऊन ते कोरे प्रवेशपत्र प्रवेश अर्जासोबत पाठवावयाचे आहे.तसेंच प्रवेश पत्राचे सुरुवातीला रिकाम्या जागी परीक्षार्थीने स्वतःचा संपूर्ण पत्ता टपालसूची क्रमांकासह लिहावा.**

३३) प्रत्येक परीक्षार्थीने प्रवेश अर्जावर सेवापुस्तकात नोंद केल्यापमाणे ओळखण्यासाठी अंगावरील खुणा द्याव्यात. ही माहिती प्रवेश अर्जामधील वैयक्तिक माहिती मध्ये द्यावयाची आहे. ही माहिती संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित करावयाची आहे.

३४) प्रत्येक परीक्षार्थीने प्रवेश अर्जासोबत २२.५ x १० सें.मी. आकाराचे पाकीट स्वतःचे पूर्ण नांव, स्वतःचा पत्ता, गावाचे नांव, तालुका, जिल्हा, पिनकोड क्रमांक इत्यादिसह लिहून पाठवावे. **पाकीटास रुपये पाच चे तिकीट लावणे अनिवार्य आहे. अपूर्ण पत्ता व तिकीटाअभावी परीक्षा प्रवेशपत्र न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही.**

************************

# सर्वसाधारणपणे आढळणा-या त्रुटींची यादी

१) ज्या पदावर सध्या काम करीत आहेत त्याबद्दल स्पष्ट उल्लेख करीत नाहीत.

२) अर्हतेबद्दल स्पष्ट उल्लेख नसतो व प्रमाणपत्रांच्या झेरॉक्स प्रमाणित प्रती जोडलेल्या नसतात. (शैक्षणिक अर्हता)

३) ऐच्छिक विषयाचा संकेतांक लिहिलेला नसतो वा विषयाचा उल्लेख नसतो.

४) क्षेत्रिय अधिकारी म्हणजे कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता हयांच्या कार्यालयाकडून आवश्यक प्रमाणपत्रे, परीक्षार्थींच्या सेवेचा तपशील , पदाचा उल्लेख इत्यादि बाबी व्यवस्थित भरलेल्या नसतात.

५) प्रवेश अर्जावर परीक्षार्थींच्या सहया नसतात.

६) तीन पेक्षा अधिक वेळा बसणा-या परीक्षार्थीस (एम.पी.डब्ल्यू.मॅन्युअल) महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम नियमावली परिशिष्ट १ मधील नियम १२ प्रमाणे अधीक्षक अभियंता यांचे आदेश व प्रवेश अर्जातील प्रमाणपत्र अनिवार्य असते, त्याची पूर्तता होत नाही.

७) प्रवेशार्थीने भरलेली माहिती व क्षेत्रिय अधिकारी यांनी भरलेली माहिती यांत तफावत आढळते.

८) प्रवेश अर्जावर कार्यकारी अभियंता (क्षेत्रिय अधिकारी) व अधीक्षक अभियंता / अधीक्षक अभियंता व प्रशासक / मुख्य कार्यकारी अधिकारी / जिल्हा परिषद / नियंत्रक अधिकारी) यांच्याच सहया व प्रमाणपत्र लागतात.

९) प्रवेश पत्रावर (हॉल तिकीटावर) व अर्जावर फोटो लावलेला असतो पण तो राजपत्रित अधिका-यांकडून साक्षांकित केलेला नसतो.

१०) ४ (ई) मध्ये अंगावरील खुणा लिहील्या जात नाहीत.

******************************************

# महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी नाशिक
# कार्यालयाच्या वापरासाठी

| | | |
|---|---|---|
| म.अ.प्र.प्र. दप्तर नोंदणी क्रमांक व दिनांक : | | |

| | |
|---|---|
| **आसन क्रमांक :** | |

==================================================================

**विभाग १ - परीक्षार्थीचे विनंतीपत्र.**

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवणे व साक्षांकित करणे.

प्रति,

मा. मुख्य अभियंता व संचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
दिंडोरी रस्ता,नाशिक - ४२२ ००४.

दिनांक :

**(नियंत्रक अधिकारी यांचे मार्फत सविनय सादर)**

**विषय :** सन २००७ मध्ये घेतल्या जाणा-या कनिष्ठ अभियंता या पदाच्या व्यावसायिक परीक्षेस बसण्यासाठी प्रवेश अर्ज -

**संदर्भ :** मुख्य अभियंता व संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक चे जावक क्रमांक मअप्रप्रा/कअ/व्याप/प्रवेशअर्ज/ /२००७. दिनांक चे परिपत्रक.

माननीय महोदय,

मी (खाली स्वाक्षरी करणारा) आपल्या प्रबोधिनीकडून घेतल्या जाणा-या कनिष्ठ अभियंता पदाकरीता सन २००७ मध्ये घेण्यात येणा-या व्यावसायिक परीक्षेस प्रवेश मिळावा म्हणून माझा सर्व त-हेने पूर्ण भरलेला विहित नमुन्यातील अर्ज आपणास योग्य त्या मार्गाने सविनय सादर करीत आहे.

सूचना पत्रकाचे काळजीपूर्वक वाचन करुन, संबंधित व नियमानुसार लागणा-या सर्व माहितीसह परीक्षा अर्ज पूर्ण केलेला आहे. मी माझ्या माहिती प्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे अशी खात्री देतो की, अर्जातील माहिती सत्य, बरोबर आणि परिपूर्ण आहे. तसेंच परीक्षेच्या अभ्यासक्रमाची व नियमांची माहितीही करुन घेतली आहे. **प्रवेश अर्ज अपूरा किंवा त्रुटी असलेला असल्यास तो विना पत्रव्यवहार नाकारला जाईल याची मी व्यक्तिशः नोंद घेतली आहे.**

सोबत : १) अर्हता प्रमाणपत्र
२)
३)
४)

आपला विश्वासू,

स्वाक्षरी : ( )

नांव :

स्थळ :

दिनांक :

प्रप २/१२

# विभाग २ : परीक्षार्थीची /अर्जदाराची वैयक्तिक माहिती

| १) अ) व्यावसायिक परीक्षेचा संकेतांक व नांव : | १ | २ |
|---|---|---|
| | | |

| २) अ) उमेदवाराचे मुख्यालय कोणत्या जिल्हयात येते व त्या जिल्हयाचे नांव संकेतांक व नाव | १ | २ |
|---|---|---|
| | | |

| २) ब) व्यावसायिक परीक्षेसाठी निवडलेल्या केंद्राचा संकेतांक व नांव | १ | २ |
|---|---|---|
| | | |

| ३) अ) सध्या काम करीत असलेल्या विभागांचा / संघटनेचा संकेतांक व नांव : | १ | २ |
|---|---|---|
| | | |

| ३) ब) नियंत्रक अधिकारी यांचे कार्यालयाचा पत्ता, टपाल सूची क्रमांक, दूरध्वनी क्रमांक, कोड क्रमांकासह : | |
|---|---|

| ३) क) विभागाचे नांव (लागू असल्यास), पत्ता, टपाल सूची क्रमांक आणि दूरध्वनी क्रमांकासहीत : | विभागाचे नांव :<br><br>टपाल सूची क्रमांक : |
|---|---|
| | कोड क्रमांक : |
| | दूरध्वनी क्रमांक : |

४) अ) नांव :

| मराठी: आडनांव | नांव | वडीलांचे नांव / पतीचे नांव |
|---|---|---|
| | | |

इंग्रजी मध्ये (पहील्या लिपीत मोठया अक्षरात)

| SURNAME | NAME | FATHERS / HUSBANDS NAME |
|---|---|---|
| | | |

| ४) ब) पदनाम : | मराठी | इंग्रजी: |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | |



| ४) क) तांत्रिक शैक्षणिक पात्रता :<br>**(प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती जोडणे आवश्यक आहे)** | |
|---|---|

| ४) ड) सध्या आपण धारण करीत असलेल्या कार्यभाराचे स्वरुप व त्याचा संकेतांक सूचना १९ प्रमाणे : | | |
|---|---|---|

| ४) इ) सेवा पुस्तकातील नोंदीप्रमाणे शरीरावरील ओळखण्यासाठी खुणा : | |
|---|---|

| ५) अ) जन्मदिनांक | दिनांक | महिना | वर्ष |
|---|---|---|---|
| अंकी | | | |
| अक्षरी | | | |

५) ब) सेवा तपशिल :

| अ.क्र. | पद | पदावरील नेमणूकीचा दिनांक | पदावरील परीक्षेच्या १ ल्या दिवसापर्यंतची एकूण सेवा |
|---|---|---|---|
| १) | तांत्रिक सहाय्यक | | |
| २) | उपअवेक्षक / सर्वेक्षक | | |
| ३) | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | | |
| ४) | कनिष्ठ अभियंता | | |
| ५) | शाखा अभियंता | | |
| ६) | सहाय्यक अभियंता श्रेणी २ | | |

**(प्रथम ज्या पदावर नियुक्ती असेल त्या पदाची माहिती देणे व नंतर सध्या असलेल्या पदावर केव्हा आले त्याची सविस्तर माहिती देणे)**

| ६) अ) अभियांत्रिकी शाखेचा संकेतांक व नांव :<br>(सूचना क्रमांक १८) | | |
|---|---|---|

| ६) ब) मागील तीन वर्षामध्ये ज्या शाखेमध्ये काम केले त्यांचे संकेतांक व नांव (सूचना क्रमांक १९): | १ ले वर्ष | | |
|---|---|---|---|
| | २ रे वर्ष | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३ रे वर्ष | | |

प्रप ४/१२

७) व्यावसायिक परीक्षेसाठी निवडलेल्या विषयांचे संकेतांक व नांवे :

| ७) अ) अनिवार्य | संकेतांक | विषयाचे नांव |
|---|---|---|
| १) प्रश्नपत्रिका १ | | |
| २) प्रश्नपत्रिका २ | १९ | लेखानियम |
| ३) प्रश्नपत्रिका ४ (अ) | | प्रात्यक्षिक अभियांत्रिकी चित्ररेखन |
| ४) प्रश्नपत्रिका ४ (ब) | | प्रात्यक्षिक तोंडी |

७) ब) ऐच्छिक विषय :

| | १ | २ |
|---|---|---|
| १) प्रश्नपत्रिका २: | संकेतांक | ऐच्छिक विषयाचे नाव |
| | | |

| | |
|---|---|
| ८) अ) पूर्वी परीक्षेची संधी किती वेळा घेतली (सध्याची संधी सोडून)<br><br>टीप:- या परीक्षेपूर्वीच्या संधी तीनपेक्षा जास्त असतील तर नियंत्रक अधिका-यांचे वाढीव संधी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. | |

९) परीक्षा शुल्क रुपये ५००/- प्रत्येक उमेदवारामागे (जिल्हा परिषद / महामंडळ / शासकीय उपक्रम यांच्या परीक्षार्थीसाठी) :

| | |
|---|---|
| ९) अ) परीक्षा शुल्क देय आहे किंवा नाही | |

| | |
|---|---|
| ९) ब) शुल्क अदा केल्या संबंधी माहिती : | दर्शनी हुंडीचा क्रमांक : |
| | दिनांक : |
| | दर्शनी हुंडी घेतलेल्या बँकेचे नांव, शाखा : |

अर्जदाराची स्वाक्षरी :

ठिकाण : नांव :- -----------------------------------------

दिनांक : पदनाम :- --------------------------------------

# विभाग ३ : पृष्ठांकन, प्रमाणपत्रे, इत्यादि

(परीक्षार्थीच्या संबंधीत कार्यालयाने भरावयाचे)

## अ) क्षेत्रीय कार्यालयाकरीता

जावक क्रमांक ------------------------------------------

(कार्यकारी अभियंता किंवा तत्सम अधिकारी) दिनांक:

मा.अधीक्षक अभियंता / प्रशासक / आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी

-----------------------------------------------------------

----------------------------------------------------------- यांचे कार्यालय

---------------------------------------------------------- यांना पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१) सदर सहाय्यक अभियंता,श्रेणी २ / शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता / सर्वेक्षक / उपअवेक्षक / स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक / तांत्रिक सहाय्यक पुरेसे सक्षम आहेत व त्यांचे अखत्यारीतील कर्मचारी व मजूरांवर त्यांचे पुरेसे नियंत्रण असते / आहे. त्यांनी घेतलेला ऐच्छिक विषय योग्य आहे.

सदर परीक्षेच्या सुरुवातीच्या दिवसा पर्यंत त्यांनी ------------------- वर्षे सेवा पूर्ण केली आहे. आतापर्यंत त्यांनी परीक्षेची ------------- संधी घेतली आहेत. अर्जात भरलेल्या सर्व बाबींची पडताळणी त्यांच्या सेवापुस्तकाबरोबर केली आहे.

२) सेवा पुस्तकातील नोंदी प्रमाणे अंगावरील ओळख चिन्हे परीक्षार्थीने ४(ई) खाली दिली आहेत व ती बरोबर आहेत.

स्थळ :-<br>
दिनांक :-<br>
माहिती पडताळली

क्षेत्रीय कार्यालय प्रमुख यांची स्वाक्षरी व<br>
कार्यकारी अभियंता कार्यालयाचा शिक्का

प्रथम लिपीक

---

## ब) नियंत्रक अधिका-याकरीता

**(अधीक्षक अभियंता किंवा तत्सम अधिकारी)**

जा.क्र. ------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

----------------------------------- यांचे कार्यालय

दिनांक :-

मा. मुख्य अभियंता व संचालक,<br>
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,<br>
नाशिक ४२२००४ यांना सविनय सादर.

संबंधित परीक्षार्थीस परीक्षेस बसू देण्याबद्दल अनुमती देऊन आवश्यक त्या प्रमाणपत्रान्वये शिफारस करण्यांत येत आहे.

नियंत्रक अधिकारी यांची स्वाक्षरी व कार्यालयाचा शिक्का
(अधीक्षक अभियंता/प्रशासक/मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद)

प्रप ६/१२

## क) **<u>प्रमाणपत्र १ (कनिष्ठ अभियंतासाठी)</u>**

प्रमाणित करण्यांत येते की, श्री. / श्रीमती / कुमारी -----------------------------------------

-----------------------------------------पदनाम-----------------------------------------

**यांना एम्.पी.डब्ल्यू.मॅन्युअल मधील ॲपेंडीक्स १ मधील भाग ३ अ नियम ४ व १२ मधील तरतुदीनुसार व्यावसायिक परीक्षा पास होण्यास निर्धारीत संधीपेक्षा पुढे वाढीव संधीस या कार्यालयाच्या आदेश क्रमांक दिनांक प्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.**

स्थळ :
दिनांक :

नियंत्रक अधिकारी स्वाक्षरी
(अधीक्षक अभियंता / प्रशासक / मुख्य कार्यकारी अधिकारी इ.)

**टीपः- वाढीव संधी आदेशाची प्रत म.अ.प्र.प्रबोधिनीस सादर करणे आवश्यक आहे.**

---

## ड) <u>प्रमाणपत्र २</u>

### स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक / उप अवेक्षक व तत्सम संवर्गाधारी बाबतीत कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षेस बसण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र)

प्रमाणित करण्यांत येते की, श्री. / श्रीमती / कुमारी -----------------------------------------

----------------------- पदनाम ------------------------------------ यांनी परीक्षेच्या पहिल्या दिवसापर्यंत

त्यांची तांत्रिक सहाय्यक / स्था.अ.स. प्रकारची सेवा धरुन ------------ वर्षे सेवा पूर्ण केली आहे. म्हणून ते कनिष्ठ अभियंत्यांचे संवर्गामध्ये प्रवेश करण्यासाठीच्या पात्रतेसाठीच्या व्यावसायिक परीक्षेस बसण्यास शासन निर्णय पाटबंधारे विभाग क्र. इएक्सएम् १०८४/(३६२)आ(१२) दिनांक ३१ ऑगस्ट १९८४ व सीडीएस् २८६६/४०४०१ (इ-२), दिनांक ९/६/६७ अन्वये पात्र आहेत.

स्थळ :
दिनांक :

नियंत्रक अधिकारी स्वाक्षरी
(अधीक्षक अभियंता/प्रशासक/मुख्य.कार्य.अधिकारी, इ.)

---

## इ) प्रमाणपत्र ३

### (तांत्रिक सहाय्यकाचे बाबतीत कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षेस बसण्यास आवश्यक प्रमाणपत्र)

प्रमाणित करण्यांत येते की, श्री./श्रीमती/कुमारी------------------------------------------------

----------------------------पदनाम------------------------------------ यांनी परीक्षेचे पहिल्या दिवसापर्यंत

त्यांची तांत्रिक सहाय्यक / कार्यनिरीक्षक म्हणून १० वर्षाची सेवा पूर्ण केली आहे. त्याच प्रमाणे ते उपअवेक्षक पदावर पदोन्नती मिळण्यास पात्र असण्याची पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेले असून प्रचलित सेवा प्रवेश नियमानुसार पदोन्नतीचे क.अ.ची जी पदे या मंडळात भरावयाच्या ३ पटींच्या मर्यादेत ते शासन निर्णय क्र.इएक्सएम १०८४(२८६) आ.प्रशि. दिनांक ७/१०/१९८६ अन्वये पात्र आहेत

स्थळ /

दिनांक :

नियंत्रक अधिकारी स्वाक्षरी

(अधीक्षक अभियंता/प्रशासक/मुख्य कार्यकारी अधिकारी इ.)

प्रप ७/१२

## विभाग ४ (केवळ महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी कार्यालयाच्या उपयोगाकरीता)

१) अर्जाचा दप्तर नोंदणीक्रमांक व दिनांक : ----------------------------------------

२) निदर्शनास आलेल्या त्रुटी (जर असतीत तर)---------------------------------------------

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

---------------------------------------------------

३) तपासणा-या कर्मचा-याचे शेरे:

तपासणी कर्मचा-याची सही:

---

४) तपासणी अधिका-यांचे शेरे:

तपासणी अधिका-याची स्वाक्षरी
सहाय्यक संचालक (व्यावसायिक परीक्षा)

---

| प्रवेश दिला | प्रवेश नाकारला |
| --- | --- |
| | |

| | |
| --- | --- |
| दिलेला आसन क्रमांक : | |

.

उपसंचालक (व्या.प.)
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
नाशिक.

# परीक्षार्थीने द्यावयाचा स्वतःचा पत्ता

सूचना :- परीक्षार्थीने आपला पूर्ण पत्ता पुढे दिलेल्या रकान्यात ३ वेळा द्यावा.
(पत्त्यात स्वतःचे पूर्ण नांव / इमारतीचे नांव / रस्त्याचे नांव / गावाचे नांव / पोस्ट, तालुका, जिल्हा यांची नांवे व टपाल सूची क्रमांक सुस्पष्ट असावा).

| |
|---|
| |

| |
|---|
| |

| |
|---|
| |

# परीक्षार्थीच्या नियंत्रक अधिका-यांचा पत्ता

सूचना :- परीक्षार्थीने आपल्या नियंत्रक अधिका-यांचा पूर्ण पत्ता पुढे दिलेल्या रकान्यात ३ वेळा द्यावा.
(पत्त्यात नियंत्रक अधिका-याचे कार्यालयाचे नांव / इमारतीचे नांव / रस्त्याचे नांव / गावाचे नांव / पोस्ट, तालुका, जिल्हा यांची नांवे व टपाल सूची क्रमांक सुस्पष्ट असावा).

प्रप १०/१२

क्रमांक मअप्रप्र/कअ/व्याप/प्रवेशपत्र/ /२००७

महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
दिंडोरी मार्ग, नाशिक ४२२ ००४
दिनांक :

## प्रवेश पत्र

प्रति,

-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

(पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व का.अ. / अ.अ. यांनी प्रमाणित करावा)

(अर्जदाराचा संपूर्ण पत्ता पिनकोडसह) (परीक्षार्थीने स्वत:चे हस्ताक्षरांत माहिती लिहावी)

**विषय : कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) यांची व्यावसायीक परीक्षा सन २००७ परीक्षेसाठी प्रवेश पत्र -**

दिनांक २६-१२-२००७ ते २९-१२-२००७ या कालावधीत होणा-या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) व्यावसायिक परीक्षेला बसण्यासाठी आपणास या पत्राव्दारे परवानगी देण्यांत येत आहे. खालील तपशिल आपल्या माहितीसाठी आवश्यक आहे.

१.० परीक्षार्थी आसन क्रमांक :
(परीक्षार्थीने उत्तर पत्रिकेवर सदर क्रमांक टाकावयाचा आहे.)

२.० परीक्षा कार्यक्रमाचे वेळापत्रक, केंद्रावरील परीक्षा व्यवस्थापनासाठी नेमलेले केंद्रवार परीक्षा समन्वय अधिका-यांचे पत्ते व परीक्षा ठिकाण माहिती सोबत जोडली आहे. परीक्षेच्या संदर्भात आपणांस काही अडचण आल्यास आपले केंद्राचे परीक्षा समन्वय अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

| अ. क्र. | परीक्षा केंद्र व ठिकाण यांचा पत्ता | समन्वय अधिका-याचे नांव व पत्ता,दूरध्वनी क्रमांक | आपण निवडलेला ऐच्छिक विषय |
|---|---|---|---|
| | | | सिंचन व सिंचन कायदे<br>भूजलनि:सारण<br>मातीच्या धरणांची संकल्पचित्रे व बांधकाम<br>दगडी व काँक्रीट धरणाचे बांधकाम<br>उपसा सिंचन योजनांचे बांधकाम व परिरक्षण<br>पाणी पुरवठा व स्वच्छता अभियांत्रिकी<br>रस्ते, इमारती आणि पूल<br>किनारा अभियांत्रिकी<br>विंधन<br>यांत्रिकी अवजारांचा उपयोग<br>विजेचे प्रकल्प व प्रकल्पांचे व्यवस्थापनासंबंधीचे कायदे<br>जलविद्युत निर्मिती<br>उपकेंद्रे व विद्युत निर्मिती केंद्रांची अंतरिक जोडणी<br>औष्णिक विद्युत निर्मिती<br>विजेचे प्रक्षेपण व वितरण |

**उपसंचालक (व्या.प.)**
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
नाशिक.

## **<u>३.० परीक्षेसाठी विशेष सूचना :</u>**

१.० परीक्षार्थींनी परीक्षेसाठी लागणारे सर्व साहित्य उदा. पेन, पेन्सिल, रबर, ड्राईंग बोर्ड व इतर आवश्यक साहित्य स्वत: आणावयाचे आहे. परीक्षा समन्वय अधिका-यांकडून वरील साहित्य पुरविले जाणार नाही.

३.० परीक्षार्थीने या पत्रावरील खाली दिलेल्या रकान्यात स्वत:ची सही आपले वरीष्ठ राजपत्रित अधिका-यांकडून प्रमाणित करुन आणावी. त्या शिवाय परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

४.० परीक्षेस येतांना हे प्रवेशपत्र सोबत आणावे व समन्वय अधिकारी किंवा त्यांचा प्रतिनिधी ज्या ज्या वेळी मागतील त्या त्या वेळी दाखवावे.

५.० परीक्षार्थींनी कुठलाही थेट पत्रव्यवहार महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनीशी करु नये. असा पत्रव्यवहार करणा-याची गंभीर दखल घेण्यांत येईल.

**६.०** प्रवेशपत्र परीक्षेचा निकाल लागून त्याची सेवापुस्तकात नोंद होईपर्यंत जपून ठेवावे. याची दुसरी किंवा नक्कल प्रत मिळणार नाही.

७.० परीक्षार्थी पूर्वी अनुत्तीर्ण झाले असतील तर त्यांना पुन्हा सर्व विषयांना बसावे लागेल. **<u>कोणत्याही विषयामध्ये सूट देण्यांत येत नाही.</u>**

(स्वाक्षरी)
**उपसंचालक (व्या.प.)**
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक ४.

---

| परीक्षार्थीची प्रमाणित स्वाक्षरी : |
|---|

परीक्षार्थी श्री. ------------------------------------------------------------------------------------

यांनी वरील स्वाक्षरी माझे समोर केली आहे. व ती प्रमाणित करण्यांत येत आहे.

स्थळ :
दिनांक :

राजपत्रित अधिका-याची सही व शिक्का
(किमान उपअभियंता दर्जाच्या अधिका-याची सही व शिक्का)

***

प्रप १२/१२

## चेक लिस्ट

(दोन प्रतीत)

### विभाग १ - पत्र

| | | |
|---|---|---|
| १) फोटो लावणे | - | होय / नाही |
| २) स्वाक्षरी करणे | - | होय / नाही |
| ३) सहपत्रः- अर्हता प्रमाणपत्र जोडणे | - | होय / नाही |

### विभाग २ - परीक्षार्थींची माहिती

| | | |
|---|---|---|
| ४) नांव : (१) - स्पष्टपणे लिहिणे | - | होय / नाही |
| (२)- अर्हता प्रमाणपत्राप्रमाणे नांव | - | होय / नाही |
| (३) -परीक्षार्थीच्या नांवात बदल झाला असेल तर शासकीय गॅजेटची प्रत जोडणे. | - | होय / नाही |
| ५) तांत्रिक शैक्षणिक पात्रता : आवश्यक प्रमाणपत्र जोडणे | - | होय / नाही |
| ६) सेवा तपशील : वेगवेगळया पदांवर कार्यकालाची विस्तृत माहिती देणे. | - | होय / नाही |
| ७) ऐच्छिक विषय स्पष्टपणे नमूद करणे | - | होय / नाही |
| ८) परीक्षा शुल्क देय असल्यास दर्शनी हुंडी जोडणे | - | होय / नाही |
| ९) अर्जदाराची स्वाक्षरी | - | होय / नाही |

### विभाग ३ - पृष्ठांकन / प्रमाणपत्रे

| | | |
|---|---|---|
| १०) (१) माहिती पडताळणी करणा-यांनी संपूर्ण कार्यालयीन माहिती भरणे व स्वाक्षरी करणे. | - | होय / नाही |
| (२) कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी | - | होय / नाही |
| ११) नियंत्रक अधिका-याची शिफारस व सही | - | होय / नाही |
| १२) प्रमाणपत्र १ किंवा २ किंवा ३ जे लागू असेल ते पूर्ण भरुन नियंत्रक अधिका-याची सही घेणे (नियंत्रक अधिका-याशिवाय अन्य अधिका-याची सही अमान्य होईल). | - | होय / नाही |
| १३) परीक्षार्थीचा पत्ता तीन ठिकाण स्पष्ट व पूर्ण लिहीणे | - | होय / नाही |
| १४) **<u>प्रवेशपत्र:</u>** | | |
| (१) प्रति या मथळयाखाली परीक्षार्थीचा संपूर्ण पत्ता लिहीणे (टपालसूचीसह पीन कोड) | - | होय / नाही |
| (२) पासपोर्ट फोटो लावणे | - | होय / नाही |
| (३) परीक्षार्थींनी ऐच्छिक विषय लिहिणे | - | होय / नाही |
| (४) परीक्षार्थीची प्रमाणित सही | - | होय / नाही |

विभागीय / मंडळ तपासनीस लिपिकाची सही — परीक्षार्थीची स्वाक्षरी

### कार्यालयीन टिप्पणी

क्षेत्रीय कार्यालय प्रमुख यांची स्वाक्षरी
कार्यकारी अभियंता यांचा शिक्का

नियंत्रक अधिकारी
यांची स्वाक्षरी व शिक्का

***************